# सुहास्य Dental Clinic

**CENTRE FOR ESTHETICS GUM CARE & IMPLANT DENTISTRY**

## हिरडीच्या शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना सूचना

1. शस्त्रक्रयेनंतर लगेचच काही खाऊ किंवा पिऊ नये. भूल दिलेली असल्यामुळे नकळत गाल किंवा ओठ चावले जाण्याची शक्यता असते.
2. शस्त्रक्रियेनंतर डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार दिलेल्या गोळ्या घेण्यास सुरुवात करा.
3. शस्त्रक्रियेनंतर थोडा वेळ (४-५तास) थुंकीमध्ये रक्त येण्याची शक्यता आहे, तरी बाहेर थुंकु नये, आलेली थुंकी गिळून घ्यावी त्यामुळे रक्त थांबण्यास मदत होते. पुढील दोन दिवस अगदी खळखळून गुळणी करणे टाळावे.
4. शस्त्रक्रियेनंतर पुढील २४ तास शस्त्रक्रिया केलेल्या भागावर दर दोन तासांनी बाहेरच्या बाजूने १०-२० मिनीटे बर्फ लावावा त्यामुळे अधिक सूज येत नाही.
5. गाल किंवा ओठ ओढुन किंवा मोठा आ करून शस्त्रक्रिया केलेल्या जागी बघू नये. तसे केल्यास जखमेवर ताण येऊन टाके निघण्याची शक्यता असते.
6. शस्त्रक्रिया झालेल्या जागी सूज येणे स्वाभाविक आहे. ही सूज ३-४ दिवसांत कमी होईल.
7. शस्त्रक्रियेनंतर दोन दिवसानंतर कोमट मिठाच्या पाण्याने गुळण्या करा.
8. शस्त्रक्रिया केलेल्या भागावर पट्टी (Perio Dressing) लावण्यात आलेली असल्यास, ती काही तासात कडक किंवा पक्की होईल. ही पट्टी तुमच्या शस्त्रक्रिया केलेल्या भागावर एक आठवडा राहिल. ती काढण्याचा प्रयत्न करू नये.
9. शस्त्रक्रिया केलेल्या किंवा पट्टी (Perio Dressing) लावलेल्या ठिकाणी ब्रश करू नये.
10. सतत रक्त येत असल्यास किंवा पट्टीचा (Perio Dressing) काही भाग निघाल्यास किंवा पट्टी (Perio Dressing) जिभेला किंवा गालाला टोचत असल्यास आणि दुखत असल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा.
11. शस्त्रक्रियेनंतर पहिले २४तास अती गरम, तिखट आणि कडक अन्नपदार्थांचे सेवन टाळावे. थंड किंवा पातळ अन्नपदार्थांचे सेवन करावे. पिण्यासाठी स्ट्रॉ चा उपयोग करु नये. पुढील एक आठवडा शस्त्रक्रिया केलेल्या बाजुने खाऊ नये.
12. तंबाखू, दारू, सिगारेट आणि तंबाखूजन्य तत्सम पदार्थांचे सेवन पूर्णपणे वर्ज्य आहे, तसे केल्यास जखम भरण्यास अडचणी येऊ शकतात.
13. सूज आल्यास बाहेरून गालाला बाम किंवा इतर काही लावू नये अथवा गरम कपड्याने शेकू नये.

# सुहास्य Dental Clinic

**CENTRE FOR ESTHETICS GUM CARE & IMPLANT DENTISTRY**

14. गुळण्या करण्यासाठी दिलेल्या औषधाने (Mouthwash) दिवसांतून दोनदा गुळण्या कराव्या (10 ml प्रत्येक वेळी)
15. पहिला एक दिवस तुम्हाला थोडा थकवा व अशक्तपणा जाणवू शकतो. तेव्हा कष्टाचे काम करणे अथवा अधिक व्यायाम करणे टाळावे. आराम करणे योग्य.
16. शस्त्रक्रिया केलेल्या जागेवरील टाके काढण्यासाठी ७ दिवसानंतर यावे.
17. टाके काढल्यानंतर दाताची व हिरड्यांची स्वच्छता व्यवस्थितपणे करणे आवश्यक आहे त्यामुळे जखम लवकर भरण्यास मदत होते.
18. काही रुग्णांमध्ये शस्त्रक्रियेनंतर दाताची संवेदनशीलता (Sensitivity) वाढण्याची शक्यता असते, योग्य मौखिक स्वछतेद्वारे आणि गरज असल्यास Desensitizing Toothpaste चा वापर करून कमी करता येते त्यासाठी डॉक्टरांचा सल्ला घ्या.

Dr Tushar S. Shirude MDS

Periodontist & Oral Implantologist

Contact: 8600786692